REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १६ मार्च, १९३८ अंक ११

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.



एच. एच. दि छत्रपति महाराजा
ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ
टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
संगीत-मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.
गायन हार्मोनियम दिलरुबा फिडल्
किं. ६ आ. किं. २॥ रु किं. १ रु. २ आ. किं. १ रु. ४ आ.
व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

The Co-operators' Book Depot.
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published any where and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### बँकांस सुटी

बुधवार, ता. १६ मार्च, १९३८ रोजीं धूलिवंदनानिमित्त बँका बंद रहातील.

### हिंदुस्थान-अफगाणिस्थान व्यापाराचें संवर्धन

हिंदुस्थानचा अफगाणिस्थानाशी व्यापार वाढावा ह्याकरितां हिंदी सरकारनें काबूल येथें आपला एक व्यापारी प्रतिनिधी नेमला आहे. ह्या दोन देशांमधील व्यापाराविषयीं आंकडे जमा करण्यास १ फेब्रुवारी, १९३७ पासून आरंभ झाला आहे.

### व्यापारी वर्गाच्या गैरसोई व पोस्टखातें

टपाल खात्याबाबतच्या व्यापारी वर्गाच्या तक्रारी ऐकून घेऊन गैरसोई सरकारास कळविण्याचें काम पोस्ट खात्यांतील एका स्वतंत्र अधिकाऱ्याकडे देण्याचें घाटत आहे. निरनिराळ्या ठिकाणच्या व्यापारी संस्थांशीं चर्चा करून, त्यांचें म्हणणें खात्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांस कळविण्याचें काम त्यास करावें लागेल.

### एक बिघा जमिनींतून ५ शेर अफू

३० सप्टेंबर, १९३७ अखेरच्या वर्षी हिंदुस्थान सरकारच्या अफूखात्यास, त्यापूर्वीच्या वर्षाचे मानानें, ५० हजार रु. कमी उत्पन्न झालें. प्रत्येक बिघ्यांतून सरासरीनें ४·९५ शेर अफू निघाली. १९३५-३६ सालीं ६·४८ शेर इतकें दर बिघ्यामागें उत्पादन झालें होतें.

### सरहद्द प्रांतांत संगमरवरी दगड

सरहद्द प्रांतांत उत्कृष्ट प्रतीच्या संगमरवरी दगडाचा मुबलक साठा आहे, असें डॉ. कौलसन ह्या तज्ञाचें मत आहे.

### कृत्रिम रेशमाच्या उत्पादनाविषयीं प्रयोग

इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें कृत्रिम रेशमाच्या उत्पादनासंबंधीं प्रयोग करण्यासाठी ३० हजार रुपये खर्चण्याचें ठरविलें आहे.

### निकेलच्या अर्ध्या आणेल्या

१८८० सालानंतर सरकारनें नवीन ढब्बू पैसे काढलेले नाहींत, तथापि ढब्बू पैसा हें अद्याप कायदेशीर चलन आहे. दोन पैसे किंमतीचीं निकेलचीं नाणीं पाडण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या नाण्यांचा आकार ज्यास्त सोइस्कर वाटेल व तीं ज्यास्त आरोग्यकारक ठरतील, अशी अपेक्षा आहे.

### तांदुळास कोणतें खत घालणें श्रेयस्कार!

वेगवेगळ्या जातींच्या तांदुळास कोणतें खत सर्वांत चांगलें आहे व त्यास किंमत किती पडते, हें दर्शविणारा तक्ता, इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चची राइस कमिटी तयार करीत आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ८ आ. ३ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर सरासरीनें द. सा. द. शे. १ रु. ८ आ. ३ पै इतका पडला.

### कोहिनूर मिल्स कं. लि., मुंबई

वरील कंपनीस डिसेंबर, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी २ लक्ष ९४ हजार रु. निव्वळ नफा झाला. प्रत्येक भागास ८ रु. डिव्हिडंड व ४ रु. बोनस ( प्राप्तीवरील करमाफ ) जाहीर झालें. कंपनीच्या भागांची किंमत १००रु. असून त्यांचा बाजारभाव ३२५ रुपयांच्या आसपास आहे.

### न्यू ग्रेट ईस्टर्न स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग कं. लि.

वरील कंपनीस डिसेंबर, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी १ लक्ष ६८ हजार रु. नफा झाला, त्यांतून ५½ टक्के दराच्या क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांचें १९३४ व १९३५ सालांबद्दलचे डिव्हिडंड देण्यांत यावयाचें आहे. कंपनीच्या मालमत्तेचा विमा ७० लक्ष, ६२ हजारांस उतरवलेला आहे.

### देशी वैद्यकीस उत्तेजन

जेथें इंग्रजी दवाखान्यांची स्पर्धा होणार नाहीं, अशा ठिकाणीं वैद्य व हकीम ह्यांस देशी औषधांचे दवाखाने चालविण्यास मदत करण्याच्या हेतूनें, संयुक्तप्रांत सरकारनें त्यांस त्यांच्या वर्गवारीप्रमाणें सालिना ३६० अगर २४० रु. देण्याचें ठरविलें आहे. औषधें मोफत वाटण्याकरितां १२० ते १८० रुपयांची वेगळी ग्रँट त्यांस मिळणार आहे.

### खुर्च्यांच्या पायांना रबरी टाचा

मोटारी किंवा टांगे यांच्या झिजलेल्या रबरी धांवा ( टायर्स ) कापून रबराचे सारखे चौकोनी किंवा गोल तुकडे करून अर्धा ते पाऊण इंच जाड टाचांचे खुर्च्यांच्या पायांस बसवावे म्हणजे ज्या ठिकाणीं समान पातळी नसेल अशा जमिनीवरसुद्धा चारहि पायांवर खुर्ची टेकते व दगडाच्या किंवा कॉंक्रीटच्या फरशीवर ओढल्या असतां खुर्च्या वाजत नाहींत. टायर्सच्या अशा प्रकारें केलेल्या टांचा चांगल्या टिकतात व त्यांस किंमत फार थोडी पडते. लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझियम संस्थेच्या खुर्च्यांना अशा वरील प्रकारच्या टाचा बसविल्या आहेत. अधिक माहिती म्यूझियममध्यें मिळेल.

### १९३७-३८ च्या मोसमांतील उंसाचें पीक

हिंदुस्थानांतील उंसाच्या एकूण लागवडीपैकी शेकडा ५२ इतकें पीक संयुक्त प्रांतांत आहे, पंजाबचे वांटणीस १४ टक्के पीक येतें व मुंबईच्या वांटणीस फक्त ३ टक्के लागवड आहे.

### मध्यप्रांत व वऱ्हाड येथील कापड-गिरण्यांतील मजुरांचे दर

मुंबई प्रांतांतील कापड गिरण्यांमधील कामगारांच्या मजुरीचे दराबाबत चौकशी करण्याकरितां मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली होती, तिच्या शिफारसींचा आराखडा प्रसिद्ध झाला असून सरकारचा त्यावरील अभिप्रायहि जाहीर झाला आहे. मुंबई कमिटीच्या रिपोर्टाचे धर्तीवर रिपोर्ट सादर करण्याकरितां मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारनें एक कमिटी नेमली असून तिनें ३० एप्रिल पर्यंत आपला रिपोर्ट तयार करावयाचा आहे.

### इंपीरियल टोबॅको कंपनीचा नफा

इंपीरिअल टोबॅको कंपनीला गेल्या सालीं निव्वळ नफा १३ कोटि रुपये राहिला.

### खेळाकडे व्यापारी दृष्टी

इंग्लंडमध्यें दहा लक्ष लोक गोल्फ खेळतात आणि त्याप्रीत्यर्थ दर वर्षी ३० कोटि रुपये खर्चतात. तथापि हा सर्व पैसा देशांतल्या देशांत राहून हजारों लोकांस काम मिळतें, म्हणून तो खेळ उत्तेजनास पात्र आहे असें एक इंग्रज लेखक म्हणतो.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| २७-२-३८ ते ५-३-३८ | २,८४,२७६ |
| ६-३-३८ ते १२-३-३८ | १५,९४,३७३ |
| २१-९-३१ ते १२-३-३८ | ३,११,८९,४८,२८१ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ |
| १ | विविध माहिती | ... १२२ |
| २ | स्वदेशी धंद्यांच्या संरक्षणास विरोध | ... १२३ |
| ३ | "मी ब्रिटिश बँकेंत काय पाहिलें !" | १२४ |
| ४ | स्फुट विचार — युरोपांत युद्धाचे ढग जमूं लागले!—तंबाखूवरील करास विरोध—फडनवीसांचें समर्थन—मुंबई सरकारचें फिनॅन्स बिल मंजूर झालें—लँकेशायर आणि हिंदुस्थान—स्वदेशी आणि परदेशी कापड | ... १२४ |
| ५ | साखरेच्या आयातीची उतरती कमान | ... १२७ |
| ६ | मोटारींचे अपघात कसे टाळावे ! | ... १२८ |
| ७ | सप्तवार्षिक रस्तायोजनेच्या खर्चांची तरतूद | ... १२८ |
| ८ | स्पॉनिश व पोर्तुगीज नभोवाणी | ... १२९ |
| ९ | अमेरिकन कोट्याधिशांकरितां विश्रामस्थान | ... १२९ |
| १० | निवडक निवाडे | ... १३० |
| ११ | निवडक बाजारभाव | १३१ |

# अर्थ

बुधवार, ता. १६ मार्च, १९३८

## स्वदेशी धंद्यांच्या संरक्षणास सर जेम्स ग्रिग यांचा विरोध

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, हे खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचे पुरस्कर्ते आहेत, ही गोष्ट त्यांनीं वेळोवेळ प्रकट केलेल्या आर्थिक बाबींसंबंधाच्या विचारांवरून स्पष्ट झालेली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें उदारमतवादी ह्या संज्ञेनें ओळखला जाणारा एक राजकीय पक्ष आहे. त्याचप्रमाणें, त्या देशांत उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञांची एक प्रबळ परंपरा आहे. ह्या गटांतल्या लोकांचें मुख्य तत्त्व असें आहे कीं आर्थिक व्यवहारांत सरकारनें ढवळाढवळ करूं नये आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांवर नियंत्रण न घालतां त्यांमध्यें अमर्याद स्पर्धा चालू द्यावी. पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य हा त्यांच्या तत्वज्ञानाचा पाया आहे आणि संरक्षक व निर्बंधक जकाती आर्थिक दृष्ट्या समाजास अपायकारक आहेत असा त्यांचा ठाम सिद्धांत आहे. प्रचलित आर्थिक मंदी दूर होण्यास सध्याचे आंतरराष्ट्रीय व्यापारावरचे निर्बंध काढून टाकण्याचें धोरण हा एकच उपाय आहे ही त्यांची सूचना वरील विचारसरणीस अनुसरूनच आहे. ब्रिटिश सरकारचें अलीकडील आर्थिक धोरण त्यांस मनापासून पसंत नाहीं, परंतु विशिष्ट परिस्थितीकडे लक्ष देऊन अपरिहार्य म्हणून तें तात्पुरतें मान्य करण्यावांचून त्यांस गत्यंतर नाहीं. तरीहि, त्यांत हळुहळु योग्य सुधारणा व्हावी आणि राष्ट्रीय आर्थिक धोरणाचा कल पुन्हां व्यक्तिस्वातंत्र्याकडे वळावा हें मत ते वारंवार प्रतिपादीत असतात. सर जेम्स ग्रिग हे त्या परंपरेंतले आहेत आणि फडनवीस या नात्यानें त्यांच्या मतांचा परिणाम हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणावर होणें स्वाभाविक आहे. आजची परिस्थितीच अशी आहे कीं, गेलीं कित्येक वर्षें औद्योगिक संरक्षणात्मक धोरण सरकारनें अंगिकारलें आहे, त्यांत एकदम बदल करणें इच्छा असली तरी, त्यांस शक्य नाहीं. परंतु त्यांचा ओढा मात्र खुल्या व्यापाराकडे आहे आणि त्यास अनुकूल असे उद्गार त्यांच्या तोंडांतून निघाल्यावांचून रहात नाहींत. सद्यःपरिस्थिति मात्र त्यांस मागें खेचीत आहे.

मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक, ग्रँट्सबद्दलच्या मागण्या व फिनॅन्स बिल ह्यांच्या चर्चेच्या बाबतींत असेंब्लीमधल्या टोकपक्षीय सभासदांनीं मौनव्रत स्वीकारल्याकारणानें सरकारी आर्थिक धोरणावर नेहमीप्रमाणें टीका झाली नाहीं आणि सर जेम्स ग्रिग ह्यांस आपल्या विचारांचें प्रदर्शन करण्यास संधी मिळाली नाहीं. तथापि, असेंब्लींतील युरोपियन गटाचे प्रतिनिधि, मि. बस्, ह्यांनीं फिनॅन्स बिलाच्या चर्चेचे वेळीं टीकात्मक भाषण करून कांहीं सूचनाहि केल्या. त्यांस उत्तरादाखल खुलासा फडनवीसांनीं केला, त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांकडे येथें लक्ष वेधणें आवश्यक आहे. मंदीच्या प्रारंभीं अवघड परिस्थितीस तोंड देण्यासाठी सरकारनें करांच्या मामुली दरांत तात्पुरता म्हणून वाढावा ( सर्चार्ज ) केला आणि सामान्य करांची आकारणीहि चढविली. हे वाढावे अजून काढून टाकण्यांत आलेले नाहींत ते दूर व्हावे आणि करांच्या बोजाची वांटणी निरनिराळ्या वर्गांत कशी होत आहे ह्या विषयींची चौकशी नवीन नेमण्यांत आलेल्या आर्थिक सल्लागाराकरवीं व्हावी अशी मुख्य सूचना मि. बस् त्यांनीं केली होती. तिला उद्देशून सर जेम्स ग्रिग म्हणाले कीं मंदी जाऊन चलती चालू होत आहे तोंच पुन्हां मंदीचा प्रादुर्भाव होतो कीं काय ह्याची भीति पाश्चात्य राष्ट्रांत वाटावयास लागली आहे, तिकडे हिंदुस्थानें कांहीं काळपर्यंत डोळे लावून बसलें पाहिजे. मंदी चालली म्हणून जादा कर सरकारनें टाकून दिले आणि तिचा जोर पुन्हां लागलीच झाला तर तिजोरीची व्यवस्था कठीण होईल असें सांगण्याचा त्यांचा उद्देश होता. आर्थिक सल्लागाराची नेमणूक झाली असल्यानें त्यांस विशिष्ट काम दिलें पाहिजे, ह्या दृष्टीनें करांच्या वांटणीविषयींच्या चौकशीची मि. बस् ह्यांची सूचना त्यांनीं उचलली. हिंदुस्थानांतली करांची व्यवस्था पुच्छगामी आहे, म्हणजे श्रीमान लोकांवर ऐपतीच्या मानानें कमी आणि गरीबांवर ज्यास्ती भार टाकणारी आहे, असा सर जेम्स ह्यांचा स्वतःचा ग्रह आहे आणि त्याच्या सत्यत्वाची शहानिशा शास्त्रीय चौकशीच्या मार्गानें झाली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. मोठ्या कारखानदारांस संरक्षण मिळालें असतां लहान प्रमाणावरील धंद्यांचें नुकसान होतें, तेव्हां कारखान्यांवर पट्ट्या बसवून छोट्या धंद्यांस उत्तेजन द्यावें ह्या सर झियाउद्दिन ह्यांच्या सूचनेस त्यांनीं पाठिंबा देतांना औद्योगिक संरक्षणास आपण प्रतिकूल आहों हें स्पष्टपणानें दाखवलें. संरक्षणाचें धोरण टाकून देणें किंवा बदलणें हाच लहान उद्योगधंद्यास उत्तेजन देण्याचा मार्ग आहे असें ते म्हणाले. मोठे व छोटे असे दोन्ही प्रकारचे धंदे जर्मनी, जपान इत्यादि देशांत संरक्षक पद्धतीच्या अंमलांत चालूं शकतात ही गोष्ट फडनवीसांनीं दृष्टीआड केली. हिंदुस्थान सरकारनें लहान धंद्यांस सहाय केलें असतें आणि त्याविरुद्ध मोठ्या कारखानदारांनीं तक्रार केली असती तर गोष्ट वेगळी. पण सर जेम्स ग्रिग ह्यांस औद्योगिक संरक्षणाचें तत्त्वच मान्य नसल्यानें मोठे व छोटे धंदे ह्यांच्या परस्पर स्पर्धेचा त्यांचे बाबतींत प्रश्नच उद्भवत नाहीं. कोणत्याहि देशांत तेथील विशिष्ट परिस्थितीस अनुलक्षून शेती, उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या हितसंबंधांचा सरकारनें मेळ बसवावयाचा असतो आणि राष्ट्रीय उन्नतीच्या ध्येयानें आपलें आर्थिक धोरण आखावयाचें असतें. परंतु आर्थिक बाबतींत सरकारनें त्रयस्थपणा स्वीकारुन वैयक्तिक स्वार्थास मार्ग मोकळा करून द्यावा ह्या आशयाची भूमिका सर जेम्स ह्यांची असल्यानें संरक्षणामुळें लहान धंद्यांची कुचंबणा होते, ह्या त्यांच्या तक्रारींत कांहींच स्वारस्य नाहीं. न कर्त्याचा वार शनवार ह्यांतलाच हा प्रकार नव्हे काय ? सर झियाउद्दिनसारखीं माणसें मोठ्या स्वदेशी कारखान्यांविरुद्ध गिल्ला करून लहान धंद्यांचा पुरस्कार करतात, तेव्हां सर जेम्ससारखे अधिकारी माना डोलावतात. आपल्या सूचनेचा परिणाम शेवटीं 'इदंच नास्ति परं न लभ्यते' असा होणार हें त्या हिंदी गृहस्थांच्या ध्यानांत येत नाहीं.

## " मी ब्रिटिश बँकेंत काय पाहिलें ? "

बँक ऑफ इंडियाच्या पुणें शहर शाखेचे मॅनेजर, श्री. केंभावी, ह्यांचें इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स, पुणें शाखा, ह्या संस्थेचे विद्यमानें प्रो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं गेल्या गुरुवारीं व्याख्यान झालें. आपण इंग्लंडला कोणत्या उद्देशानें गेलों, तेथील प्रसिद्ध बँकांत चालणारें कामकाज पहाण्याची संधी मिळावी म्हणून त्यांत प्रवेश प्राप्त करून घेण्यासाठीं कसे प्रयत्न केले, इत्यादि गोष्टींचा वृत्तांत सांगून वेस्टमिंस्टर बँकेंतील कामाच्या पद्धतीचें निरीक्षण केलें असतां आपणांस विशेष लक्षांत ठेवण्याजोग्या कोणत्या बाबी आढळल्या ह्याचें वर्णन श्री. केंभावी ह्यांनीं थोडक्यांत पण चटकदार रीतीनें केलें. पुण्यांतील निरनिराळ्या बँकांत काम करणाऱ्या सभासदांचाच श्रोतृवर्गांत भरणा असल्यानें त्यांपैकीं कित्येकांनीं व्यावहारिक महत्त्वाचे अनेक प्रश्न व्याख्यात्यांस त्यांच्या भाषणाचे अखेरीस विचारले. श्री. केंभावी ह्यांनीं प्रश्नांचीं योग्य उत्तरें दिलीं. इंग्लिश बँकांतली टापटीप व शिस्त हीं वाखाणण्यासारखीं असतात, जनतेशीं त्यांचें वर्तन अत्यंत सौजन्याचें असतें, रोकड मोजणें, जमाखर्च लिहिणें, इत्यादि कामें यांत्रिक पद्धतीनें होतात, चेक्सचे पैसे गिऱ्हाइकांस विलंब न लागतां मिळतात, गिऱ्हाइकांचे खात्यावर पुरी शिल्लक आहे कीं नाहीं हें पहाण्याचें कारण पडत नाहीं, बँकेंतील नोकर लोकांची कार्यक्षमता वाढावी म्हणून सारखे प्रयत्न चालू असतात. विलायतच्या मानानें इकडील बँकांतील युरोपियन अधिकाऱ्यांस आवाच्या सवा पगार मिळतो, निरनिराळ्या व्यवहारांबद्दलचे फॉर्म्स तयार असल्यानें व्यवहार सुकर होतात, बँकांमध्यें परस्पर-सहकार्य उत्कृष्ट होतें व प्रत्येक बँकेंतील अधिकारी व नोकर ह्यांचे संबंध स्नेहाचे असतात, इत्यादि माहिती व्याख्यात्यांनीं त्यांस विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांमध्यें दिली. सभेचे अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं व्याख्यात्यांचे आभार मानले इंग्लंडमध्यें सरकारी व बिनसरकारी नोकर आणि सामान्य जनता ह्यांस सौजन्यानें व शिस्तीनें वागण्याचें उत्तम शिक्षण मिळालेलें असल्यानें बँकिंगचे व इतर व्यवहार अत्यंत सुरळीत व कार्यक्षम रीतीनें चालतात, हें त्यांनीं नाटकगृहें, आगगाड्यांचीं स्टेशनें इत्यादि सार्वजनिक ठिकाणीं हिंदुस्थानांत धक्काबुक्की माजते व अव्यवस्था चालते आणि विलायतेंत तसें होत नाहीं ह्याचीं उदाहरणें देऊन तुलनात्मक दृष्टीनें स्पष्ट करून सांगितलें. युरोपियन व हिंदी नोकर लोकांचे पगाराबाबत प्रो. काळे यांनीं व्याख्यात्यांनीं सांगितलेल्या माहितीस पुष्टी दिली. विलायतेंतील लोक सद्गुणांचे पुतळे आहेत आणि हिंदी लोक कुचकामाचे आहेत, असा मुळींच प्रकार नाहीं. तथापि, परकीयांचे विशेष गुण उचलून, स्वतःमधले दोष प्रत्येकानें ओळखावे व ते दूर करण्यास झटावें हें उचित आहे. हिंदुस्थानांतील आधुनिक पद्धतीचा बँकिंगचा धंदा ब्रिटिश बँकिंगच्या पद्धतीचा असल्यानें विलायतेंतील अनुभव आपणांस मार्गदर्शक होण्यासारखा आहे. श्री. केंभावी यांच्यासारख्या माहितगार गृहस्थानें मिळविलेली माहिती विशेष उपयुक्त होण्याजोगी आहे. अशा प्रकारचीं भाषणें आणि विचारविनिमय आपल्या इंस्टिट्यूट शाखेच्या विद्यमानें वारंवार होणें हितावह आणि आवश्यक आहे असें सांगून अध्यक्षांनीं आपलें समारोपाचें भाषण पुरें केलें.

---

## स्फुट विचार

### युरोपांत युद्धाचे ढग जमूं लागले ?

राष्ट्रा-राष्ट्रांत स्नेहभाव आणि परस्पर-विश्वास प्रस्थापित झाल्यावांचून सर्व जगास पीडा देणारी सध्याची आर्थिक दुःस्थिति सुधारणार नाहीं हा सिद्धांत सामान्य रीतीनें सार्वत्रिक मान्यता पावला असतां आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष घडवून आणण्याविषयींच्या योजनांची चर्चा चालली असतां युरोपियन राजकारणाचें वातावरण अधिकाधिक प्रक्षुब्ध होत असून प्रगतीची व शांततेची आशा नष्ट करणाऱ्या गंभीर स्वरूपाच्या घडामोडी पाश्चात्य देशांत होत आहेत. चीन व स्पेन ह्या देशांत रणधुमाळी चालली आहे आणि जर्मनी व इटली ह्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचा पारा झपाट्यानें चढला आहे. युरोपियन शांततेच्या रक्षणासाठीं ब्रिटिश प्रधानमंडळानें बर्लिन व रोम येथें सामोपचाराचीं बोलणीं नुकतींच चालू केलीं होतीं. इतक्यांत जर्मनीनें ऑस्ट्रियन राष्ट्राचें राजकीय स्वातंत्र्य हिरावून घेऊन तेथें आपली सत्ता लष्करी शक्तीच्या जोरावर प्रस्थापित केल्याची बातमी आली आहे. जर्मनीनें शेजाऱ्याच्या घरावर आंतील कांहीं लोकांच्या सहायानें दिवसा ढवळ्या दरवडा घातला आहे आणि ऑस्ट्रियन राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास त्याच्या सहायास धांवण्याचें सामर्थ्य व तयारी कोणाचीच नसल्यानें हें हिटलरी साहस यशस्वी झालें आहे. व्हर्सईच्या तहास अनुसरून ऑस्ट्रियाचें स्वातंत्र्य अबाधित राखण्यास राष्ट्रसंघ वास्तविक रीतीनें बांधलेला आहे. परंतु त्या संघाचा पाया अगोदरच पोखरला गेला असून त्याची इमारत डळमळित झाली आहे. जर्मनी, इटली, जपान इत्यादि राष्ट्रें त्यामधून केव्हांच बाहेर पडलीं असून राष्ट्रसंघास कोणीच पुसेनासें झालें आहे. ऑस्ट्रियांत जर्मन वंशाच्या लोकांची बरीच मोठी संख्या आहे ह्या सबबीवर तें राष्ट्र जर जर्मनीस सामील करण्यांत आलें तर तशाच परिस्थितींतल्या झेकोस्लोव्हेकिया इत्यादि शेजारच्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य तरी कसें टिकणार ? महायुद्धानंतर जेत्या राष्ट्रांनीं अमेरिकेच्या संमतीनें बसवलेली युरोपियन राजकारणाची व राष्ट्रव्यवस्थेची घडी जर्मनीनें विस्कटून टाकली असून इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांस एक प्रकारचें आव्हानच केलें आहे. युद्धाचे ढग युरोपियन आकाशांत जमत आहेत आणि त्यांचेकडे सर्व जगाचे डोळे लागून राहिले आहेत.

---

### तंबाखूवरील करास विरोध, फडनवीसांचें समर्थन

तंबाखूवरील कराच्या नवीन योजनेमुळें मुंबई कॉर्पोरेशनचें पांच लक्ष रुपयांचें नुकसान होईल, असा एक मुद्दा विरोधी पक्षानें मुंबई विधिमंडळांत उपस्थित केला. मुंबई कॉर्पोरेशननें आपल्या बजेटांत हे पांच लक्ष रुपये मामुली उत्पन्न म्हणून गृहीत धरले होते, व आतां एकाएकी ती रकम सरकारनें आपणाकडे घेणें इष्ट नाहीं, असें विरोधकांचें म्हणणें होतें. प्रस्तुत बिल नापास झाल्यास हे पांच लक्ष रुपयेच नव्हेत तर सबंद सोळा लाखांच्या उत्पन्नास कॉर्पोरेशनला मुकावें लागेल असें उत्तर फडनवीसांनीं दिलें. त्यांचा युक्तिवाद हजरजबाबीपणाच्या दृष्टीनें बिनतोड असला तरी वरील आक्षेपास त्यानें उत्तर दिलें असें होत नाहीं, हें उघड आहे. सबंद प्रांताचें हित कोणत्याहि स्थानिक संस्थेच्या हितापेक्षां अधिक महत्त्वाचें गणलें गेलें पाहिजे ही सरकारची भूमिका समर्थनीय आहे असें म्हणावें लागेल. तंबाखू पेरणारे शेतकरी, विडीच्या कारखा-

न्यांत काम करणारे मजूर, इत्यादींच्या कोणाच्याच हितास तंबाखू विलानें बाध येणार नाहीं, असें सांगून फडनवीसांनीं विरोधकांचें म्हणणें तपशीलवार खोडून काढलें. तंबाखूकरास मागें खुद्द फडनवीसांनींच नागरिक ह्या नात्यानें विरोध केलेला होता, ह्याची त्यांस आठवण करून देण्यांत आली तेव्हां परिस्थिति बदलली असतां मतें बदलावीं लागतात असा रोखठोक जबाब सभासदांस मिळाला. कोणताहि नवीन कर बसविला जातो किंवा जुन्याची पुनर्घटना होते तेव्हां अशा प्रकारचा विरोध त्यास होणें स्वाभाविक आहे आणि त्यांत अनपेक्षित अथवा गैर असें कांहींच नाहीं. तंबाखूकरावरील चर्चेत अनेक साधक–बाधक मुद्यांवर चर्चा होऊन विधिमंडळानें आपल्या कर्तव्याबाबत उत्कृष्ट जागरूकता दाखविली, हें नमूद करण्यासारखें आहे.

## मुंबई सरकारचें फिनॅन्स बिल मंजूर झालें

मुंबई सरकारच्या फिनॅन्स बिलास कनिष्ठ व वरिष्ठ दोन्ही कायदेमंडळांची संमति मिळून, त्यांतील कराची योजना मंजूर झाली. विजेच्या खपावरील पट्टींत वाढ व स्टॉकएक्स्चेंजवरील व्यवहारांवर स्टँपड्यूटीची आकारणी, हीं सदरहु बिलांतील महत्त्वाचीं अंगें होतीं. मुंबई येथील वीजकंपनीनें विजेचा दर उतरविण्याचें कबूल केलें असून, हा उतार सरकार स्वतःकडे परस्पर वळवून घेणार आहे, ह्यामुळें ग्राहकांवरील कराचा बोजा वाढणार नाहीं. २० युनिटांपेक्षां कमी वीज वापरणारास पूर्वीचीच पट्टी द्यावी लागेल, तींत वाढ होणार नाहीं. सरकारनें दिलेल्या लायसेन्सखालील एकमेव द्वितीय अधिकारामुळेंच वीजकंपन्यांस मोठा नफा होऊं शकतो; स्पर्धेचा त्यांत प्रश्नच उद्भवत नाहीं, ह्या कारणानें कंपन्यांच्या नफ्यांत ग्राहकांस व जनतेस भागीदारी मिळण्याचा हक्क आहे, अशा प्रकारचें तत्त्व वरील योजनेच्या मुळाशीं आहे. मुंबई येथील वीजकंपन्यांप्रमाणें इतर ठिकाणच्या कंपन्यांशीहि सरकारचें बोलणें चालू आहे, व त्यासुद्धा आपला दर थोडा उतरवून सरकारी पट्टीचा बोजा स्वतः उचलतील, असा भरंवसा फडनवीसांस वाटत आहे. प्रस्तुतचा कर आडमार्गानें बसविला जात असल्याविषयीं कायदेमंडळांत तक्रार केली गेली, परंतु मुळींच कर न बसण्यापेक्षां तो अशा रीतीनें कां होईना, बसविला जाणें इष्ट आहे, असें उत्तर ह्या आक्षेपास फडनवीसांनीं दिलें. विजेवरील कर हें सरकारच्या सामाजिक धोरणाचें निदर्शक समजण्यास हरकत नाहीं आणि ह्याबाबतची पुढील योजना दूरगामी स्वरूपाची दिसून आल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

## लँकेशायर आणि हिंदुस्थान

ह्या देशांत लँकेशायरच्या बनावटीचें कापड येतें, त्यावर हिन्दी कापडाच्या गिरण्यांच्या संरक्षणार्थ बसवलेली आयात जकात आज २५ टक्के आहे, ती पूर्वीप्रमाणें ११ टक्के करावी अशी मागणी ब्रिटिश कारखानदार आपल्या सरकारकडे करीत आहेत. हिंद–ब्रिटन व्यापारी कराराच्या अटींची चर्चा चालू असतां त्या विषयाकडे ब्रिटिश सरकारचें लक्ष वेधण्याच्या लँकेशायरच्या गिरणीवाल्यांनीं चालविलेल्या खटपटीचा उद्देश उघड व स्पष्ट आहे. होऊं घातलेल्या करारांत, ब्रिटिश गिरण्यांच्या मालावरील हिन्दी जकात कमी झाल्यावांचून इंग्लंड हिंदुस्थानाच्या व्यापारास सवलती देणार नाहीं असा आग्रह धरण्यांत यावा ह्या अर्थाची त्यांची ही सूचना आहे. लँकेशायरच्या उत्पादनाची व विक्रीची सध्या परिस्थिति काय आहे ह्याची माहिती प्रस्तुत प्रश्नाच्या चर्चेत महत्त्वाची असल्यानें आम्ही ती येथें देत आहों. अनेक वर्षांच्या तीव्र मंदीनंतर लँकेशायरचा धंदा आपलें डोकें थोडेसें वर काढूं लागला होता, तोंच त्याच्या प्रगतीची गति पुन्हां कुंठित झाली आहे. एक वर्षामागें कपाशीचे भाव चढत होते तेव्हां कापड व सूत ह्यांस जोराची मागणी येऊन नऊ–दहा महिन्यांच्या मुदतीनें तयार करून द्यावयाच्या मालाचे करार कित्येक गिरणीवाल्यांनीं केले आणि त्यांच्या कारखान्यांची चलती सुरू झाली. परंतु लवकरच कपाशीचे भाव उतरले आणि मंदीची छाया गिरण्यांच्या धंद्यावर पडली. चालू वर्षाच्या प्रारंभीं तयार माल पडून राहिलेला दिसून आला. त्यास प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें चांगली मागणी होती. पण परदेशांतील व्यापाऱ्यांनीं हात आखडल्याकारणानें कांहीं गिरण्यांतर्ले उत्पादन बंद करण्याची पाळी आली. १९३७मध्यें ज्याप्रमाणें व्यापाऱ्यांनीं खरेदीचे करार मोठ्या उत्साहानें केले होते, तसा प्रकार चालू सालीं घडण्याची आशा नाहीं. पडून राहिलेल्या कापडाचा व सुताचा उठाव कसाबसा हळु हळु होईल, इतकेंच.

## स्वदेशी आणि परदेशी कापड

आपल्या मालाचा खप परदेशांत कसा वाढेल ह्याची चिंता लँकेशायरच्या गिरणीवाल्यांस लागलेली आहे. १९३७सालीं एकूण १९२ कोटि चौरसवार इतकें ब्रिटिश बनावटीचें कापड परदेशांमध्यें खपलें. खुद्द इंग्लंडमध्यें तेवढेंच कापड खपलें असलें पाहिजे असा अंदाज आहे. म्हणजे, गेल्या सालचें एकूण ब्रिटिश उत्पादन सुमारें ४०० कोटि चौरसवार इतकें भरलें. ब्रिटिश साम्राज्यांतील देशांपैकीं पश्चिम व दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व कॅनडा ह्यांमध्यें मागील दोन वर्षांच्या मानानें ब्रिटिश कापडास खप बरा आहे. तो चालू सालीं कायम राहील आणि ब्रिटनमधल्या अंतर्गत खपांतहि घट होणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानाशीं मात्र व्यापार वाढेल किंवा नाहीं, ह्याची लँकेशायरला जबरदस्त शंका वाटत आहे. महायुद्धापूर्वीं, म्हणजे पंचवीस वर्षांचे मागें, लँकेशायरमधल्या एक–तृतीयांश कापडाच्या व सुताच्या गिरण्या केवळ हिंदुस्थानांतील खपावर चालत असत. त्या काळच्या मानानें लँकेशायरचा ह्या देशाशीं होणारा व्यापार ८५ टक्क्यांनीं कमी झाला आहे. ह्या प्रचंड घटीनें ब्रिटिश कापडाच्या धंद्यास विलक्षण धक्का दिला असून गमावलेलें हिंदी गिऱ्हाइक पुन्हां त्याचे हातीं जाण्याची लँकेशायरला आशा वाटत नाहीं. जपानच्या स्पर्धेचा प्रश्न बाजूस ठेवला तरी हिंदी गिरण्यांच्या विस्ताराचे योगानें ब्रिटिश मालाची येथील गिऱ्हाइकी संपुष्टांत आली आहे ही प्रस्तुत प्रकरणांतली महत्त्वाची गोष्ट होय. १९२६–२७ सालीं हिंदी गिरण्यांतील कापडाचें उत्पादन सुमारें २२६ कोटि चौरसवार होतें. १९३६–३७ मध्यें, म्हणजे दहा वर्षांत, तें १३१ कोटि वारांनीं वाढून ३५७ कोटि चौरस वार झालें. त्याच दशवार्षिक मुदतींत ब्रिटिश कापडाची निर्गत १२९ कोटि वारांनीं कमी होऊन त्या मालाची जागा हिंदी स्वदेशी कापडानें घेतली. लँकेशायरची गिऱ्हाइकी हिंदुस्थानाप्रमाणें इतर देशांमध्येंहि कमी होत असून प्रत्येक ठिकाणीं स्वदेशी मालाची पैदास वाढत आहे. जर्मनी, हॉलंड, ब्राझिल, चीन वगैरे देशांत हीच प्रवृत्ति ठळकपणानें दिसून येत आहे. चीनचें कापडाचें उत्पादन, उदाहरणार्थ, १५ कोटि चौरस वारांपासून १०० कोटि वारांपर्यंत गेल्या पंचवीस वर्षांत वाढलें आहे. जेथें स्वदेशी कापडाचा धंदा जोरांत नाहीं, अशा देशांतच आतां लँकेशायरच्या व्यापाराचे विस्तारास वाव आहे. संरक्षक जकातीच्या भिंतीवरून चढून परदेशांत प्रवेश करण्याचें सामर्थ्य ब्रिटिश कापडास प्राप्त होणें कठिण आहे.

### वसंत–व्याख्यानमाला, पुणें
### वर्ष ६४ वें

वसंत व्याख्यानमालेचें यंदाचें व्याख्यानसत्र ता. १ मेपासून सुरू होणार आहे. यंदा विशेष देण्यासारखे विषय सुचविण्यांत आल्यास त्यांचा अवश्य विचार करण्यांत येईल; विषयाबरोबर त्या त्या विषयांतील तज्ज्ञ वक्त्यांचें नांवहि सुचविण्यांत आलें तर बरें, अशी चिटणिसांची सूचना आहे.

### प्रो. काळे ह्यांचीं इंस्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या सभासदांसाठीं व्याख्यानें

परराष्ट्रीय हुंडणावळ आणि देशी बँकिंगची जुनी पद्धति ह्या विषयांवर प्रो. काळे ह्यांचीं व्याख्यानें होणार आहेत. पहिलें व्याख्यान बुधवार ता. १६ मार्चला आहे. पुढील व्याख्यानांचे दिवस योग्य वेळीं प्रसिद्ध केले जातील.

### खेडा जिल्ह्यांतील पुलाच्या कामास प्रारंभ

मुंबई–अहमदाबाद रस्त्यास हिंदुस्थान सरकारची मंजूरी मिळेल, ह्या अपेक्षेनें मुंबई सरकारनें खेडा जिल्ह्यांतील पुलाचें काम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. ह्या पुलास सुमारें २ लक्ष रुपये खर्च येईल.

### नेपाळमधील ब्रिटिश वकिलाचा खर्च

नेपाळमधील ब्रिटिश वकिलातीचा खर्च सालिना २ लक्ष रुपये येतो, तो हिंदुस्थान सरकार सोसतें. हा खर्च ब्रिटिश सरकारनें सोसावा, अशी विनंति हिंदुस्थानातर्फे करण्याचा सरकारचा विचारहि नाहीं असें मध्यवर्ती असेंब्लींत सांगण्यांत आलें.

### हिंदी शेतकऱ्यांसाठी रेडिओ

बंगालचे माजी गव्हर्नर, सर जॉन अँडरसन, ह्यांनीं लंडन येथें दिलेल्या मुलाखतींत एक मनोवेधक दृश्य नुकतेंच रंगविलें. हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यांतील खेड्यांत शेतकरी सायंकाळीं आपल्या सवंगड्यांबरोबर रेडिओजवळ आकाशवाणी ऐकत बसला आहे व तिचें रहस्य त्यास समजावून सांगण्यांत येत आहे, असें चित्र त्यांनीं आपल्या भाषणांत रेखाटलें.

### डॉ. स्लेटर यांचा मृत्यु

सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ, डॉ. गिल्बर्ट स्लेटर, हे गेल्या आठवड्यांत मृत्यु पावले. ते कित्येक वर्षें मद्रास विश्वविद्यालयांत हिंदी अर्थशास्त्राचे अध्यापक होते.

### विंडसर कॅसलमध्यें मोटारवेगावर नियंत्रण

बादशहांनीं आपल्या विंडसर कॅसलच्या आवारांत मोटारींच्या वेगावर नियंत्रण घातलें आहे. दर तासास १० मैलांपेक्षा जास्त वेगानें मोटारी चालविण्यांत येतां कामा नयेत असा हा निर्बंध आहे.

### स्वित्झरलंडमधील राष्ट्रभाषा

स्वित्झरलंडमध्यें फ्रेंच, जर्मन व इटालियन ह्या तीन भाषा राष्ट्रीय गणल्या जातात. सुमारें ४४ हजार स्विस लोक रोमान्श भाषा बोलतात, तिलाहि राष्ट्रीय महत्त्व मिळावें, अशी खटपट चालू आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,२६,४०० वसूल झालेलें भांडवल १,१३,०००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

अप–टु–डेट शिलाई करतां
## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक पुणें १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
## गेस्ट हाउस
टेलिफोन नं. ७७१ : लक्ष्मी रोड–गणपती चौक–पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

### साखरेच्या आयातीची उतरती कमान

हिंदुस्थानांत होणारी साखरेची आयात सालोसाल कशी कमी होत चालली आहे, हें खालील कोष्टकावरून लक्षांत येईल. १९३४–३५, १९३५–३६ व १९३६–३७ ह्या वर्षासंबंधाचे पु=या १२ महिन्यांचे आकडे व १९३६-३७ आणि १९३७-३८ ह्या सालांचे पहिले नऊ महिन्यांचे आकडे आणि साखर पाठवणाऱ्या देशांचीं नांवें तुलनेकरितां दिलीं आहेत.

| | १९३४-३५ | १९३५-३६ | १९३६-३७ | १९३६-३७ (९ महिने) | १९३७-३८ (९ महिने) |
|---|---|---|---|---|---|
| देश | टन | टन | टन | टन | टन |
| ग्रेट ब्रिटन | १६,७८४ | २३,४४४ | २८१ | २१४ | २०६ |
| जाव्हा | १,७५,७३१ | १,५०,४१६ | १५,०२२ | १३,५६२ | ९,५९३ |
| बेल्जम | २,०७२ | २६२ | २९ | २९ | २४ |
| चीन | १,८९१ | ९३५ | १,९०७ | १,४४९ | ३७७ |
| हाँकाँग | १,९७० | २,१३० | ३,१०३ | २,३४० | १,५०९ |
| एकूण | २,२२,७२७ | २,०१,१५७ | २३,०७५ | १९,६६७ | १२,७७१ |

### मुंबई प्रांतांतील उंसाचें पीक

सबंध हिंदुस्थानांत चालू मोसमांत एकूण ३८ लक्ष, १५ हजार एकरांत ऊंस लावलेला असून त्यापैकी मुंबई प्रांताचे हद्दींत १ लक्ष, १६ हजार एकर आहेत. त्यांतील पुनः ४१ हजार एकर संस्थानी हद्दींत आहेत. गेल्या वर्षीपेक्षा चालू सालीं ११ टक्क्यांनीं लागवड कमी झाली. एकूण उत्पादन २ लक्ष ८४ हजार टन होईल, अशी अपेक्षा आहे. हा आकडा मागील वर्षीतील उत्पादनाच्या आकड्यापेक्षा ३२ हजारांनीं कमी आहे. गुजरातमध्यें पिकाची परिस्थिति बरी आहे. दक्षिण भागांत ऊंस चांगला उतारा देईल अशी अपेक्षा आहे. कर्नाटकांतील पीक नेहमीपेक्षा कमी प्रतीचें आहे.

### कपास विचार करून पेरा

कपाशीचे बाजारभाव जागतिक कारणांमुळें अत्यंत खाली गेलेले आहेत. हिंदुस्थानांत तयार होणारी कपास उत्पादन-खर्चहि भागवूं शकत नाहीं अशी परिस्थिति झाली आहे. चालू वर्षीतील शिल्लक कपाशीचा साठा बराच मोठा असल्यानें, कपाशीच्या भावांत लवकर सुधारणा होईल अशी आशा बाळगण्यास जागा नाहीं. तेव्हां कपाशीचें उत्पादनच कमी करणें आवश्यक झालें आहे. मुंबई प्रांतांतील कपास पेरणाऱ्या शेतकऱ्यांचे नजरेस ही परिस्थिति आणण्यासाठी मुंबई सरकारनें प्रचार करण्याचें ठरविलें आहे. कपाशीऐवजी धान्यें पेरल्यास शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारेल व गुरांसहि पोटास मिळेल, असें धोरण वरील प्रचाराचे मुळाशीं आहे. शेतकी खातें ह्याबाबत सल्ला देणारीं पत्रकें तयार करीत आहे. फक्त उत्कृष्ट व सकस जमिनींत कपास पेरणें आज आर्थिक दृष्ट्या नुकसानकारक होणार नाहीं; इतर ठिकाणीं दर एकरी कमी उत्पादन होऊन तोटा होईल, असा सरकारचा इशारा आहे. खाद्य धान्यें पेरण्याऐवजी गळिताचीं धान्यें, तंबाखू इत्यादि लावल्यास हरकत नाहीं, परंतु कपाशीची लागवड उत्कृष्ट जमिनीखेरीज इतरत्र करूं नका व लावाल ती फक्त सुधारलेल्या जातीची कपास लावा, असा शेतकऱ्यांस सरकारचा सल्ला आहे.

## पूर्व खानदेश जिल्ह्याकरितां फ्रूट सेल यूनियन

पूर्व खानदेश जिल्ह्यांत जिरायत पिकापासून पावसाचे व भावाचे अनियमितपणामुळें उत्पन्नांत फारच कमी कसर रहाते. त्यामुळें शेतकऱ्यांचा बागाईत पिकाकडे जास्त ओढा उत्पन्न झाला आहे हें दिवसेंदिवस संत्री-मोसंबीच्या वाढत्या लागवडीवरून ध्यानांत येईल. पूर्व खानदेश जिल्ह्यांत केळींचें पीकहि बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होत असतें. हा माल बाहेर प्रांतांत मोठ्या प्रमाणांत जातो असतो. केळी व इतर बागाईत पिकास योग्य भाव न मिळाल्यामुळें शेतकरी नाउमेद होत आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन पूर्व खानदेश जिल्हा ( शाखा जळगांव ) को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटनें सहकारी तत्त्वावर सबंध जिल्ह्याकरितां फळविक्री करणारी सहकारी संस्था ( धी पूर्व खानदेश फ्रूट सेल को-ऑपरेटिव्ह यूनियन लिमिटेड, जळगांव ) या नांवाची स्थापन करण्याचा ठराव केला आहे. फळबागाची लागवड प्रत्येक तालुक्यांतून फार थोड्या गांवांत असल्यामुळें संस्था पद्धतशीरपणानें फायद्याचे दृष्टीनें चालण्याकरितां संस्थेचें क्षेत्र जिल्ह्यापुरतें मर्यादित असणें योग्य आहे. वरील फळविक्रीची संस्था को-ऑपरेटिव्ह ॲक्टाखालीं रजिस्टर केली जाईल व त्यावर सहकारी खात्याची देखरेख राहील. वरील फ्रूट सेल यूनिअनकरितां ५०,००० रुपयांचें भांडवल शेअररूपानें उभारावयाचें आहे. प्रत्येक शेअर १० रुपयांचा राहील. शेअर घेऊं इच्छिणारास १ रुपया प्रवेश फी द्यावी लागेल. शेअरची रक्कम दोन हप्त्यांनीं देतां येईल. सदर यूनियन ही बागाईतदार शेतकऱ्यांचा फळमाल बाहेर प्रांतांत अगर स्थानिक बाजारांत कमिशन घेऊन विकणार असल्यामुळें यूनियनला व बागाइतदाराला चांगला नफा मिळण्यास जागा आहे.

### रत्नागिरी येथील हस्तव्यवसाय प्रदर्शन

मिरजोळें ग्रामसुधारणा मंडळातर्फे रत्नागिरी येथें हस्तव्यवसाय प्रदर्शन ता. २७–३–३८ ते ३१–३–३८अखेर भरविण्यांत येणार आहे. आगाऊ १० दिवस लेखी कळविणाऱ्या देशी कारखानदारांस स्वतंत्र स्टॉल मिळूं शकेल. स्टॉलची लांबी १० फूट, रुंदी १० फूट व उंची ८ फूट राहील. चालू सालच्या प्रदर्शनास खादी प्रदर्शनाचीहि जोड देण्यांत यावयाची आहे. अ. भा. ग्रामोद्योग संघामार्फत विविध ग्रामोद्योगांची प्रात्यक्षिकेंहि भरविलीं जातील. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज व डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ह्यांसहि त्याबाबत विनंति करण्यांत आली आहे. रत्नागिरी जिल्ह्याचे सर्व भागांतील कारागिरीचे जिन्नस प्रदर्शनांत मांडले जातील.

### केळवा–माहीम तालुका अॅ. रेक्विझिट सप्लाय सोसायटी लि.

पालघर तालुक्यांतील शेतकऱ्यांस पेंडीचें खत पुरविण्याचें उद्देशानें वरील सोसायटी १९१२ सालीं स्थापन करण्यांत आली. मध्यंतरीं तिला दुःस्थिति प्राप्त झाली होती, परंतु १९३१ नंतर आतां तिची चांगली प्रगति होत आहे. तिच्या पटावर १५१ सभासद आहेत व तिनें आपल्या रिझर्व्ह फंडांतून ६ हजार रु. खर्चून एक मार्केट बांधलें आहे. सोसायटीची सुवर्ण ज्युबिली गल्या आठवड्यांत महसूल मंत्री, श्री. मुरारजी, ह्यांचे अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळीं अध्यक्षांनीं सहकारी चळवळीचें महत्त्व प्रतिपादन केलें.

## मोटारींचे अपघात कसे टाळावे ?

मोटारींच्या वाढत्या अपघातांस आळा कसा बसवावा ह्याविषयीं सर्व देशांतून प्रयत्न करण्यांत येत आहेत. हिंदुस्थानांतहि हा प्रश्न उपस्थित झालेला असून अपघात टाळण्याच्या उपायांसंबंधीं चर्चा चालली आहे. मोटार लॉऱ्या व बसेस ह्यांच्या वहातुकीचे नियंत्रणाकरितां व्यावहारिक तरतूद कशी करावी ह्याविषयीं सूचना करण्यासाठी नोव्हेंबर, १९३६ मध्यें हिंदुस्थान सरकारनें रौटन कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन आतां एक वर्ष लोटत आलें, तरी अद्याप त्याबाबतचा कायदा झालेला नाहीं. मोटार वाहतुकीच्या नियंत्रणाबरोबर मोटार सारथ्याची कार्यक्षमता वाढविण्याची आवश्यकता निर्विवाद आहे व त्यांची कार्यक्षमता वाढावी, अशी तरतूद होणें इष्ट आहे. सुरक्षितपणें गाडी हांकतां येणें हें सारथ्याच्या हुशारीवर आणि बरोबर अंदाज बांधण्याच्या शक्तीवर अवलंबून रहातें, ह्या दृष्टीनें खालील प्रश्न व त्यांचीं उत्तरें उद्‌बोधक वाटतील:—

( १ ) ब्रेकांचा व शिंगांचा शक्य तितका कमी उपयोग करणें, हें चांगल्या ड्रायव्हिंगचें लक्षण समजलें जातें, तें कां ?

उत्तर:—अगदीं जरूर त्या वेळींच त्यांचा उपयोग केल्यानें वेग व अंतर ह्यांची चांगली कल्पना येते, इतरांचा निष्काळजीपणा ध्यानांत येतो व अपघातांची शक्यता कमी होते. शिंगांच्या आवाजानें तो ऐकणाऱ्या इतर ड्रायव्हरांच्या मनाची चलबिचल होते व त्यांचा गाडीवरील ताबा ढिला पडतो.

( २ ) आपल्या पुढील, मागील व बाजूच्या वहातुकीव्यतिरिक्त इतर कोणत्या गोष्टींकडे मोटारहाक्याचें लक्ष असावें ?

उत्तर:—अनपेक्षित घटनेकडे. एकदम अवतीर्ण होणारा सायकलस्वार, गाडी, कुत्रा, मूल इ., समोरील मोठ्या गाड्यामुळें दृष्टीस होणारा प्रतिबंध, लोकांचा जमाव, अदृश्य वळण, इतरांचा निष्काळजीपणा अगोदर सूचना न मिळतां थांबणाऱ्या अगर वळणाऱ्या इतर गाड्या, इत्यादींविषयीं चिंतन केलें असतां, स्वतःच्या गाडीस अपघात होण्याचा संभव कमी उरतो.

( ३ ) मध्यम परंतु कायम अशा वेगानें मोटार हाकण्याची संवय शक्य तितक्या लवकर लावून घेण्याचें महत्त्व कोणतें ?

उत्तर:—गर्दीच्या रस्त्यांवर त्यामुळें इतरांस वेगाची बरोबर कल्पना मिळते व प्रत्येक वाहनाचें स्थान अंदाजतां येतें.

( ४ ) दुसऱ्या गाडीचे पुढें आपली मोटार काढावयाची असल्यास काय करावें ?

उत्तर:—तिच्या मागें यावें, पुढच्या गाडीच्या सारथ्यानें आपणांस पाहिलें असल्याविषयीं खात्री करून घ्यावी व आपणांस पुढें जावयाचें आहे हें त्यांस समजलें असल्याबद्दल खातरजमा झाल्यानंतर व त्यानें पुढें जाण्यास इशारत दिल्यावर मग गाडी पुढें काढावी. त्याला न कळत पुढें गेल्यास तो बिचकून गाडीवरील त्याचें नियंत्रण सैल होण्याची भीति असते.

( ५ ) दुसरा ड्रायव्हर, पादचारी अगर इतर कोणींहि रस्त्यावर दिसल्यास मनांत प्रथम कोणता विचार यावा ?

उत्तर:—तो कांहीं तरी वेडगळाप्रमाणें वागून धोका निर्माण करील, असा विचार करून त्याच्या चुकीमुळें स्वतःस अगर इतरांस इजा होऊं नये, अशी दक्षता बाळगण्याची मनांत भावना उत्पन्न व्हावी.

ह्याप्रमाणें अनेक गोष्टी मोटारहाक्यांस ध्यानांत बाळगाव्या लागतात. ह्या सर्वांचा निर्देश येथें करतां येणें अशक्य असल्यानें त्यांचें सामान्य स्वरूप ध्यानांत यावें म्हणून त्यांपैकीं कांहीं वर दिल्या आहेत.

### सप्तवार्षिक रस्तायोजनेच्या खर्चाची तरतूद

मुंबई सरकारनें रस्त्यांबाबत एक सप्तवार्षिक योजना आंखली आहे व तिच्यासाठीं ३½ कोटि रुपयांची तरतूद करण्यांत यावयाची आहे. येत्या सात वर्षांत खाली दर्शविल्याप्रमाणें खर्च करण्यांत येईल:—

| | कर्ज न काढतां लक्ष (रु.) | हजार | कर्ज काढून लक्ष (रु.) | हजार |
|---|---|---|---|---|
| उत्तर भाग | ४३ | ०८ | ४३ | ७७ |
| मध्य भाग | ९७ | ३२ | ७८ | ८५ |
| दक्षिण भाग | ३४ | ७२ | ५२ | ३१ |
| एकूण— | १७५ | १२ | १७४ | ९३ |

एकंदर खर्च अजमासें—३½ कोटि रु.

भडोच जवळील नर्मदेवरील पूल व बडोदें हद्दींतिल माही नदीवरील पूल हे स्वतंत्र कर्ज उभारून पुरें करण्यांत येतील. मुंबई-पुणें रस्त्यावर ३० लक्ष रुपये खर्चण्यांत यावयाचे आहेत. त्या रकमेची तरतूद प्रांतिक रोडफंडांतून होईल.


३० एप्रिल १९३८ अखेर होणाऱ्या
तृतीय त्रैवार्षिक मूल्यमापनापूर्वीं आपला विमा उतरवून
नवीन बोनसमध्यें भागीदार व्हा.

२० व्या शतकांत विमा उतरणें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. एकदां विमा उतरण्याचे ठरल्यावर तो "कॉमनवेल्थ" सारख्या राष्ट्रीय व प्रगतिप्रिय संस्थेंत उतरणें श्रेयस्कर आहे.

अधिक माहितीकरितां लिहा :

दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं. लि०
पुणें २.

शाखा: मुंबई, मद्रास, अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली.



"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

कि. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

## हिंदुस्थानाच्या बाहेरील देशांत हिंदी लोक

### दक्षिण आफ्रिका

" औद्योगिक, शेतीविषयक व आर्थिक हितसंबंधांचे बाबतींत दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी रहिवाशांची परिस्थिति जवळ जवळ असह्य होऊन गेली आहे. त्यासंबंधांत अनेक कायद्यांचे मसुदे कायदे मंडळापुढें मांडण्यांत आले आणि त्यांतल्या कांहीं कलमांची तीव्रता कमी व्हावी ह्याविषयीं सभासदांची मनें वळवण्यांत थोडेसें यश मला आलें. गेल्या वर्षी मंजूर झालेल्या कायद्यांपैकीं बारा कायद्यांचा परिणाम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या हिंदी लोकांस जाचक होण्यासारखा आहे. ही परिस्थिति दुःखदायक व अनुकंपनीय आहे, आणि ती तशीच राहूं देणें खरोखर शक्य नाहीं."—सय्यद सर रझाअल्ली, . दक्षिण आफ्रिकेंतून परत आलेले हिंदुस्थान सरकारचे तेथील एजंट जनरल.

### ऑस्ट्रेलिया

" श्वेत ऑस्ट्रेलिया" चें धोरण अंमलांत येण्यापूर्वी ऑस्ट्रेलियांत कायमचे रहिवासी झालेले हिन्दी लोक आहेत. त्यांची संख्या दोन हजार असून, त्यांतले बहुतेक पंजाबी आहेत. त्यांपैकीं कांहीं मोठे धंदेवाले आहेत. हिंदी रहिवाशांच्या परिस्थितीचे बाबतींत दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया त्या देशांमध्यें कांहींच साम्य नाहीं. ऑस्ट्रेलियांतले हिन्दी रहिवाशी सुखी आहेत. त्यांची कांहीं किरकोळ गाऱ्हाणीं असलीं तरी एकंदरीनें त्यांस न्यायानें वागवण्यांत येतें. श्वेतवर्णीयांचे बरोबरीनें त्यांस राजकीय हक्क आहेत. सिव्हिल सर्व्हिसमध्यें प्रवेश आणि खाणींचा धंदा करण्यास परवाने ह्याविषयीं त्यांच्या तक्रारी आहेत, पण त्याहि संबंधांत कायद्याची आडकाठी नाहीं. —श्री. पी. एन. सप्रू, एंपायर पार्लमेंटरी कॉन्फरन्सला गेलेले प्रतिनिधि.

### ग्रेटब्रिटनमधून स्पॅनिश व पोर्तुगीज नभोवाणी

ग्रेटब्रिटनमधील रेडिओ स्टेशनमधून स्पॅनिश व पोर्तुगीज भाषांतून ब्रॉडकास्टिंग करण्यास ता. १४ मार्च रोजीं प्रारंभ झाला. आंतरराष्ट्रीय भाषा या दृष्टीनें स्पॅनिश भाषेचा अनुक्रम इंग्रजी, फ्रेंच व जर्मन ह्यांचे खालोखाल येतो. मध्य व दक्षिण अमेरिकेंतील रेडिओवाल्यांस त्यांचे भाषेंतून बातम्या व भाषणें ऐकविण्याचा प्रस्तुत ब्रिटिश प्रयत्न आहे. "ब्रिटिश शब्दाची विश्वासार्हता सबंद जगास पटलेली आहे" असे उद्गार ह्या संबंधांत अर्ल विंटरटन ह्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटांत नुकतेच काढले, त्यास धरूनच वरील उपक्रम आहे.

### अमेरिकन कोट्याधिशांकरितां विश्रामस्थान

न्यूयॉर्कमधील कोट्याधीश व्यापारी व कारखानदार आपल्या रोजच्या दगदगीमधून निसटण्यासाठीं कॅलिफोर्निया अगर फ्लॉरिडा इकडे जातात, परंतु त्यांचा कामधंदा त्यांस तेथेंहि सतावून सोडतो व विसावा मिळूं देत नाहीं. ही त्यांची अडचण ओळखून एका अमेरिकन डॉक्टरानें ऑस्ट्रिया देशांत एका जुन्या सरदाराचा वाडा खरेदी केला आहे व त्यांत अमेरिकन कोट्याधिशांसाठी तो शांतिस्थान निर्माण करणार आहे. ह्या शांतिस्थानांत प्रवेश मिळण्यापूर्वी प्रत्येक 'रोग्या' स आपलें जुनें नांव टाकून नवें नांव धारण करावें लागेल व उद्योगधंद्याकडे मी ढुंकूनहि पहाणार नाहीं, असें वचन लिहून द्यावें लागेल. लांकडे फोडण्याचा व्यायाम त्याजकडून करवून घेतला जाईल.

वन्देमातरम शिकाकई साबू

स्टॉकिस्ट : मा. गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणे २

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

व्ही. व्ही. अँन्ड को०

जंपर स्पेशालिस्ट

लेडीज अँन्ड जेन्टस टेलर्स,

४८ शिवाजी पेठ ( मुदलीयार रोड ), पुणें शहर.

**चोरीचा चेक वटवून दिल्याचा परिणाम : १.००० रु. भुर्दंड**

लक्ष्मीनारायण जयनारायण ह्यांनीं ता. २७ मे, १९३७ रोजीं चुनिलाल हिरालाल ह्यांचे नांवें १,००० रुपयांचा चेक काढून पाठविला. हा चेक क्रॉस केलेला असून ज्याचें नांवानें तो काढलेला होता त्यास अगर त्याचे हुकुमान्वयें दुसऱ्यास त्याची रकम मिळावी, अशा स्वरूपाचा ('ऑर्डर') तो होता. २८ मे रोजीं आपण स्वतःच चुनिलाल हिरालाल आहोंत, असें भासवून एकानें हिरानंद वळीराम ह्या फर्ममधून ८७ रुपयांचा माल घेतला व किंमतीबद्दल चेक दिला. त्यानें चेकवर 'चुनिलाल हिरालाल' अशी सही केली व बाकी राहिलेली रकम उद्यां, चेक वटल्यानंतर, घेऊन जातों, असें सांगितलें. मालाची किंमत वजा जाऊन त्यास ता. ३० मे रोजीं बाकी रकम मिळाली. कांहीं दिवसानंतर, आपण काढलेला चेक चोरीस गेला असल्याचें लक्ष्मीनारायण जयनारायण ह्यांस आढळून आलें. चोराचा पत्ता लागला, त्यास अटक झाली व शासनहि मिळालें.

चेक वटविणारे हिराचंद वळीराम ह्यांनीं रकमेची भरपाई करण्याचें नाकारलें. चेक मुं. प्रॉ. को. बँकेवर होता, तिच्याकडूनहि भरपाई व्हावी ह्यासाठी लक्ष्मीनारायण जयनारायण ह्यांनीं बँकेस प्रतिवादी केलें, परंतु बाँबे को. सोसायटीज् ॲक्टाच्या ७० व्या कलमाप्रमाणें नोटीस दिली गेली नाहीं, ह्या कारणाकरितां बँकेवरील दावा काढून घेण्यांत आला.

आपलेकडून माल खरीदण्यांत आला नसतां, तर आपण चेक वटविण्याचें कधींच कबूल केलें नसतें, असें प्रतिवादी नं. १, हिरानंद वळीराम, ह्यांनीं सांगितलें. तथापि गिऱ्हाइकाकडून चेक घेतांना प्रतिवादीनें आवश्यक ती दक्षता बाळगली नाहीं, असा हायकोर्टानें शेरा मारून चोराचा चेकवर कांहींच मालकी हक्क नसल्यानें प्रतिवादीसहि कसलाच हक्क प्राप्त होत नाहीं, असा निर्णय दिला आणि वादीस १,००० रु. देवविले.

---

**केवळ वयांत आल्यानें पोटगीहक्क जात नाहीं**

कोर्टाच्या ता. २२ ऑक्टोबर, १९३४ च्या हुकुमान्वयें, तात्याभाई अब्दुल हुसेन ह्यांस आपल्या दोन मुलांस पोटगी म्हणून २५ रु. द्यावे लागत असत. दोन मुलांपैकी एक, इब्राहिम, वयांत आला आहे, तेव्हां पोटगीसंबंधांतील कोर्टाचा हुकूम बदलून मिळावा, असा तात्याभाईनीं ता. २०-२-३७ रोजीं सुरतच्या फर्स्ट क्लास सिटी मॅजिस्ट्रेटकडे अर्ज केला. मुलाच्या केवळ वयांत येण्यामुळें पोटगीच्या हुकुमांत बदल करण्याजोगी परिस्थिति निर्माण होत नाहीं, असा मॅजिस्ट्रेटनीं निवाडा केला. सेशन्स जज्जांचें मत उलट पडलें व हायकोर्टाकडे प्रकरण गेलें. स्वतःच्या चरितार्थापुरतें मिळवितां येतें किंवा नाहीं, हा ह्या बाबतींत महत्त्वाचा प्रश्न आहे, वयांत येणें हा नव्हे, असा हायकोर्टानें शेरा मारून, इब्राहिमास स्वतःच्या चरितार्थाचें साधन आहे किंवा नाहीं ह्याविषयीं फर्स्ट क्लास कोर्टानें साक्षीपुरावा घेऊन योग्य तो निर्णय द्यावा असें फर्माविलें.

---

**एक लक्ष रुपये दंड माफ**

श्री. मनसुखलाल कोठारी हे जुलै, १९३७ मध्यें आगबोटींतून मुंबई बंदरांत उतरले, त्यावेळीं त्यांचेजवळ तीन लक्ष रुपयांचे हिरे सांपडले. जकात चुकविण्याच्या प्रयत्नाबद्दल म्हणून कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनीं त्यांस दोन लक्ष रु. दंड केला. श्री. कोठारी ह्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूकडे अपील केलें, त्यांत त्यांस एक लक्ष रु. दंड माफ झाला.


गव्हाचे पोहे

(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.


ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.

बँकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.



टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]

मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashiv Peth POONA

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११९—५ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०४—९ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—८ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८—६ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६—४ |
| ३¾% १९४८-५२ ... ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३२-१० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११९—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५१—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११८—२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३९५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १६३-१२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४४-१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०-१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ४०—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४४७५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०५-१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०८ ) १५ रु. २ आ. ... | १७१—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २५२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १०९०—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४—९½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१—४ |


**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.**

( स्थापना—८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस—औंध ( सातारा )

शाखा—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, बिचूद स्टेशन व दिघंची.

चालूं ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे—सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.

**न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई**

( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—

(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ९ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोमाफ प्रिंटिंग, सर्डीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

SAHYADRI INS. Co

NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX.

Particulars by post or in person.

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आंजच रु. २४, किंवा प्रथम ६४८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर - मुंबई.

यांचे ओरिजिनल

**ब्राह्मी तेल**

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर

**बाळंतकाढा**

मुलांकरितां बाळकडू.

कुमारी आसव

नं. १ दहा दिवसांत घेणेचा.


नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.

मुख्य दुकानः ठाकुरद्वार, शाखाः परळ व दादर.

पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९: सायंकाळीं ४॥ ते ५॥.




बेडेकर

डेक्कन मसाला


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें